पुढारी

# निव्वळ शून्य उत्सर्जनासाठी भरीव प्रयत्नांची आवश्यकता

## प्र-कुलगुरू डॉ. पाटील; विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी जगभरात विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न स्थानिक पातळीवर व्हायला हवेत. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासन व राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'नेट झीरो एमिशन : ए ग्लोबल नेसेसिटी' या विषयावर एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंज, झीरो कार्बन व नेट झीरो एमिशन, अशा अनेक संज्ञांचे सामान्य माणसाला कुतूहल आहे. अशा पद्धतीच्या प्रबोधनात्मक चर्चा सातत्याने घडवून आणणे आवश्यक आहे.

ग्लासगो परिषदेत झालेल्या चर्चेनुसार २०७० पर्यंत 'नेट झीरो एमिशन' साध्य करण्यासाठी काय करावे लागेल, या दृष्टीने डॉ. सुभाष आठल्ये, डॉ. मधुकर बाचुळकर व कर्नल शशिकांत दळवी या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रोफेसर डॉ. राजन पडवळ यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका विशद केली. यावेळी विश्व वन्यजीव निधीचे सुहास वायंगणकर, ग्राहक प्रबोधन प्रचार प्रांत समिती प्रमुख सचिन जंगम, दिनकर चौगुले, विश्वास पवार, डॉ. सीमा देसाई, प्रा. अनिकेत परदेशी आदी उपस्थित होते. डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात उशिरापर्यंत काम

कोल्हापूर : आर्थिक वर्षाचा अखेरचा दिवस गुरुवारी असल्याने शिवाजी विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाचे रात्री उशिरापर्यंत काम सुरू होते. विविध अधिविभाग आणि प्रशासनातील विभागांमधील बिले संगणक प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याचे काम करण्यात येत होते. संशोधनासाठी निधी, राज्य सरकारच्या निधीसाठी प्रस्ताव सादर करणे आदींचा त्यांमध्ये समावेश होता. अधिविभाग, प्रशासनातील विभागांमधील कर्मचारी बिले जमा करण्यासाठी वित्त व लेखा विभागात आले होते.

तरुण भारत

# विद्यापीठातील मार्च एंडिंगची कामे संपली

कोल्हापूर : मार्च एंडिंगच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाचे कामकाज गुरुवारी उशिरापर्यंत सुरू होते. विविध विभागातील बिलांच्या नोंदी संगणकव्दारे केल्या. सर्व अधिविभागातील प्राध्यापक, लिपिक, कर्मचारी गेल्या आठ दिवसापासून मार्च एंडिंगच्या कामात व्यस्त होते. गुरूवारी रात्री उशिरापर्यंत कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सुटकेचा श्वास सोडला.